**कृपया प्रसिध्दीसाठी** **27 एप्रिल 2012**

## श्री.राम नाईक,माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) यांनी मुंबईत 27 एप्रिल 2012 रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

**मुंबई, शुक्रवार :**पश्चिम रेल्वेवर चर्चगेट ते डहाणू थेट लोकल सेवा सुरु करण्यासंबंधी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल तसेच उपनगरी पहिल्या वर्गाच्या भाड्यात केलेली दरवाढ रद्द करण्याचा विचारही करण्यात येईल, असे आश्वासन रेल्वे मंत्री श्री.मुकुल रॉय यांनी माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळास गुरुवारी दिल्ली येथे दिले. शिष्टमंडळात खासदार श्री.पियुष गोयल, आमदार श्री.चिंतामण वनगा, डहाणूच्या माजी नगराध्यक्ष आणि बोरीवलीच्या नगरसेविका श्रीमती मनिषा चौधरी, वसई-विरार महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. राजन नाईक, महाराष्ट्र आय टी सेलचे श्री. विनित गोयंका, महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र मेहेर आणि वसईचे श्री. रामदास मेहेर यांचा समावेश होता, तसेच चर्चेच्यावेळी रेल्वे मंडळाचे वाहतुक सदस्य श्री. के.के.श्रीवास्तव आणि विद्युत सदस्य श्री. कुलभूषण उपस्थित होते.

चर्चेसंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले,''रु.57 कोटी खर्च करुन विरार-डहाणू रेल्वे मार्ग रुंद करण्यात आला असून चर्चगेट ते डहाणू या मार्गावर विद्युत प्रवाह डायरेक्ट करंटच्या ऐवजी (डी.सी.) अल्टरनेट करंटमध्ये (ए.सी.) परिवर्तीत करण्यात आला आहे. त्यामुळे चर्चगेट ते डहाणूपर्यंत थेट लोकल सेवा सुरु होऊ शकते. तांत्रिकदृष्ट्या असे करणे शक्य असल्याचे रेल्वे मंत्र्यांनी मान्य केले तसेच लोकलसेवा सुरु करण्यासंबंधी सकारात्मक निर्णय शक्यतो लवकरच घेण्यात येईल असे सांगितले. याशिवाय दुस-या वर्गाची तसेच ए.सी.थ्री टायर आणि ए.सी. चेअर कार यांची प्रस्तावित भाडेवाढ रेल्वे मंत्र्यांनी रद्द केली परंतु त्या सेवेच्या समकक्ष असलेल्या सर्वसाधारण पहिल्या वर्गाची प्रति किलोमीटर 10 पैशाची भाडेवाढ मागे न घेतल्याने प्रथम वर्गाच्या उपनगरी प्रवाश्यांना भेदभावाची वागणूक दिली असल्याने ती भाडेवाढही मागे घेण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी तत्वतः न्यायाची असल्याचे रेल्वे मंत्र्यांनी मान्य केले असून ही भाडेवाढ रद्द करण्याचा विचार केला जाईल असे आश्वासनही दिले.''

डी.सी.च्या ऐवजी ए.सी. विद्युत प्रवाहाचे काम पूर्ण झाले असल्याने आता लोकल गाड्या ताशी 80च्या ऐवजी 100 किलोमीटर वेगाने म्हणजे 25 टक्के अधिक वेगाने धावू शकतात. यामुळे तसेच अद्यावत् सिग्नल व्यवस्थेमुळे जास्त उपनगरी गाड्या धावू शकतात हे श्री. राम नाईक यांनी रेल्वे मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे दर ताशी 80 किलोमीटरच्या गतीच्या आधारावर तयार केलेल्या गाड्यांचे विद्यमान वेळापत्रक बदलून 100 किलोमीटर गतीच्या आधारावर नवे वेळापत्रक तयार करण्यात यावे आणि ते करताना प्रवासी संघटनानाही विश्वासात घेण्यात यावे अशी श्री. नाईक यांनी मागणी केली. ही सूचना व्यवहार्य असल्याचे रेल्वे मंत्र्यानी मान्य करुन त्याप्रमाणे कारवाई करण्याची सूचना रेल्वे मंडळाच्या वाहतुक सदस्यांना दिली.

''वरील तीन मागण्यांशिवाय 72 लाख प्रवासी असलेल्या व्यवस्थेची श्वेतपत्रिका काढून त्याद्वारे सध्या चालू असलेल्या आणि भविष्यात सुरु करावयाच्या सर्व योजनांची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी करण्यात आली. त्याला रेल्वे मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन मुंबई बरोबरच कोलकाता आणि चेन्नई यांचा समावेश करुन या तीनही महानगरांची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याचे रेल्वे मंत्र्यानी मान्य केले आहे,'' असेही श्री. राम नाईक यांनी सांगितले.

मुंबईत रेल्वे प्रवासी वाहतुकीतील गर्दीचा प्रचंड ताण लक्षात घेऊन 9 डब्यांच्या गाड्या 12 डब्यांच्या करण्याच्या कामाला अग्रक्रम देण्यात यावा तसेच 15 डब्यांच्या गाड्या सुरु करण्याच्या कामाला गती देण्यात यावी आणि त्यासाठी नवे डबे खरेदी करण्याच्या योजनेसाठी अधिक निधी उपलब्ध करुन देण्याची मागणीही शिष्टमंडळाने केली. गर्दीच्या स्थानकावर एका फलाटावरुन दुस-या फलाटावर जाण्यासाठी 50 सरकते जिने (एस्कलेटर्स) यावर्षी पूर्ण करण्यात येतील असे रेल्वे मंत्र्यांनी अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये सांगितले होते, तर अर्थसंकल्पीय गुलाबी पुस्तकामध्ये मध्य रेल्वेवर 33 जिने रु. 20.79 कोटी खर्चून आणि पश्चिम रेल्वेवर 18 जिने रु. 11.34 कोटी खर्चून बांधण्यात येतील असा उल्लेख आहे, परंतु त्यासाठी प्रत्येकी फक्त रु. 10 लाखाची तरतूद केली आहे असे श्री. नाईक यांनी निदर्शनास आणले असता 50 जिने निश्चितपणे पूर्ण करण्यात येतील असे स्पष्टीकरण रेल्वे मंडळाच्या वाहतूक सदस्यांनी दिले.

''रेल्वे मंत्र्यांनी मुंबईला येऊन प्रवासी संघटनांशी प्रत्यक्ष संवाद करण्याची शिष्टमंडळाने केलेली विनंतीही श्री. मुकुल रॉय यांनी मान्य केली आहे,'' असेही शेवटी श्री. राम नाईक यांनी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**